




Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com








वर्ष २ रे | अंक : ६२९ . वा | शनिवार | दि. १६ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये


# जिजाऊ बँकेतील घोटाळ्यांविरोधात नागपूर अधिवेशनावर उपोषण सुरु...

## सहकार विभाग व जलसंपदा विभागाविरोधात उपोषणकर्त्यांचा रोष...

**जनसंचलन/ बुलढाणा**

अमरावती येथील जिजाऊ कमर्शिय को-ऑप. बँकेचे अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे व त्यांच्या काही संचालक सहकाऱ्यांच्या अनिर्बंध भ्रष्टाचाराविरोधात चार उपोषणकर्त्यांनी उपोषणाला सुरवात केली आहे. या उपोषणकर्त्यांचा मुख्य रोख हा जलसंपदा विभाग व सहकार विभागाच्या अधिकाऱ्यांच्या विरोधात आहे. मागील वर्षीदेखील हे उपोषणकर्ते उपोषणास बसले होते, परंतु तेंव्हा सहकार आयुक्त अनिल कवडे यांनी आश्वासन देऊनही उपोषणकर्त्यांच्या तोंडाला पाने पुसली होती, असा आरोप उपोषणकर्त्यांचा आहे. उपोषणकर्त्यांमध्ये उत्तम चरपे, बाळासाहेब वैद्य, सुरेश उमक, दिगंबर पुरी व स्वप्नील देशमुख यांचा समावेश आहे. उपोषणकर्त्यांचे म्हणणे आहे की, आमची तक्रार ही जलसंपदा विभाग आणि सहकार विभाग, दोघांविरोधातही आहे. कारण कोण्याही सरकारी अधिकाऱ्याला वित्तीय संस्थांचे पद उपभोगता येत नाही. परंतु जिजाऊ कमर्शियल को-ऑप. अमरावती बँकेचे अध्यक्ष अविनाश कोठाळे व त्यांच्या अनेक सहकारी संचालकांनी सरकारी नोकरीत असतानाही नियम डावलून जिजाऊ कमर्शियल को-ऑप. अमरावती या संस्थेत पदे घेतली. विशेष म्हणजे त्यांनी यासाठी आपल्याच वरिष्ठांची दिशाभूल केली. त्यांनी अनेक वर्षे एकीकडे सरकारी नोकरी,

**जिजाऊ कमर्शियल अमरावती बँकेचा प्रताप भाग-२०१**

तर दुसरीकडे बँकेचे अध्यक्ष व संचालकपद भोगले. परंतु हे सगळे होत असताना जलसंपदा विभागातील कोण्याही अधिकाऱ्याने कोठाळे व त्यांच्या संचालकांवर कारवाई केली नाही. त्यामुळे अशा दोषी अधिकाऱ्यांविरोधात कारवाई करावी, अशी उपोषणकर्त्यांची मागणी आहे. याशिवाय उपोषणकर्त्यांची तक्रार ही सहकार खात्याच्या विरोधातही आहे. जिजाऊ बँकेचे संचालकपद व अध्यक्षपद भोगताना कोठाळे व त्यांच्या काही संचालकांनी मोठ्या प्रमाणात बँकेत अनिर्बंध भ्रष्टाचार केला. त्यांनी अनेकदा नियम डावलून बँकेचे कामकाज रेटले. नियमबाह्य पद्धतीने आपल्या मर्जीतील लोकांना कर्जाचे वाटप केले. आज त्यातील बरेचसे कर्ज हे बुडित आहे. कोठाळे व त्यांच्या संचालकांनी आपल्या मर्जीतील लोकांचे नियमबाह्य कर्ज व व्याज माफ केले. मर्जीतील कर्जदारांना कमी व्याजदर, तर मर्जीत नसलेल्यांना जादा दराने कर्जवाटप केले. बँकेत अनेक प्रकारचे गैरव्यवहार करून स्वतःच्या तुंबड्या भरल्या. रिझर्व्ह बँक असो किंवा सहकार खाते या सर्वांच्या आदेशाची पायमल्ली केली. बँकेत अवैधरित्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा भरणा केला. सीईओचे पद भरताना नियम डावलले. काही खातेदारांच्या खात्यातील रक्कम अवैधरित्या संचालकांच्या खात्यात वळती केली. मर्जीत नसलेल्या कर्जदारांच्या घरांवर दिवसाढवळ्या दरोडे टाकून त्यांच्या घरातील जीवनावश्यक सामान चोरून नेले. असे एक ना अनेक प्रकारचे गैरप्रकार आणि प्रचंड भ्रष्टाचार कोठाळे यांनी केला आहे. हे सर्व पाहता या सर्व घोटाळ्यांची सखोल चौकशी करून कोठाळे व त्यांच्या लुटारू संचालकांच्या विरोधात तात्काळ चौकशी करून त्यांच्यावर कठोर कायदशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी या उपोषणकर्त्यांनी केली आहे. दैनिक जनसंचलन ने देखील सातत्याने महाभ्रष्टाचारी कोठाळे व त्यांच्या लुटारू संचालकांच्या विरोधात सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित केली आहे. त्यांचा सर्व भ्रष्टाचार हा इत्थंभूत पुराव्यांनिशी जनतेसमोर ठेवला आहे. त्यामुळे तात्काळ अशा लुटारू लोकांवर कारवाई करावी, अशी मागणीदेखील आम्ही या निमित्ताने करीत आहोत.




गेल्या वर्षी सहकार आयुक्तांनी पुसली तोंडाला पाने उपोषणकर्त्यांनी आरोप केला आहे की, कोठाळे यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करून कारवाई करावी, यासाठी मागील वर्षीदेखील हिवाळी अधिवेशनात उपोषण केले होते. त्या वेळीही प्रशासनात मोठी खळबळ उडाली होती. परंतु मागील वर्षी सहकार आयुक्त अनिल कवडे यांनी आश्वासन दिले होते की, जिजाऊ बँकेत होत असलेल्या गैरव्यवहारांची संपूर्ण चौकशी करण्यात येईल व दोषींवर कारवाई करण्यात येईल. परंतु अद्यापही यासंदर्भात योग्य ती कारवाई करण्यात आली नाही. मागील वर्षी सहकार आयुक्तांनी आमच्या तोंडाला पाने पुसली होती. त्यामुळे या वेळी पुन्हा आम्ही उपोषणाला सुरवात करीत केली आहे. आता कारवाई सुरू होईपर्यंत आम्ही उपोषण मागे घेणार नाही, असा ठाम विश्वास उपोषणकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

# जिल्हा परिषदेने लाखो रुपये खर्चून डोंगर खंडाळा गावाला दिला आयुर्वेदिक दवाखाना,मात्र कर्मचारी नसल्यामुळे तो पडलाय धुळखात...

**जनसंचलन/बुलढाणा**

डोंगर खंडाळा गावासह परिसरातील चार ते पाच गावातील नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी असलेला डोंगर खंडाळा येथील जिल्हा परिषदेचा आयुर्वेद दवाखाना मागील पाच महिन्यापासून बंद आहे. त्यामुळे नाईलाजास्तव गोरगरीब रुग्णांना आर्थिक भुर्दंड सहन करून खासगी दवाखान्यात उपचार करून घ्यावे लागत आहे. पाच महिन्यापासून दवाखाना बंद असतानादेखील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कुठलीच दखल घेतली नाही. त्यामुळे परिसरातील रुग्णांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत आहेत. रुग्णांची हेळसांड थांबविण्यासाठी हा दवाखाना पुर्ववत सुरू करण्यात यावा, अशी मागणी होत आहे. ग्रामीण भागातील रुग्णांना वेळेवर उपचार मिळावा, यासाठी मागील काही वर्षापूर्वी डोंगर खंडाळा येथे जिल्हा परिषद प्रशासनाने आयुर्वेद दवाखान्याची निर्मिती केली आहे. या दवाखान्याला डोंगर खंडाळा, खेर्डी, रुईखेड टेकाळे, बोराळा, गोंदणखेड, वरवंड, डोंगर शेवली यासह इतर गावे जोडण्यात आली आहे. परिसरात बहुसंख्य नागरिक वास्तव्य असल्याने त्यांचा भरवसा आयुर्वेद दवाखान्यावर आहे.असंख्य रुग्ण ॲलोपॅथीच्या दवाखान्यात जाता आयुर्वेद औषधी घेतात. यापूर्वी या दवाखान्यात उपचार करून असंख्य रुग्ण बरे झाले आहेत. परंतु गेल्या पाच महिन्यापासून या दवाखान्याला कुलूप लावण्यात आले आहे. गावांसह परिसरातील असंख्य रुग्ण उपचारासाठी या रुग्णालयात येतात. परंतु दवाखान्याला कुलूप पाहून ते परत जातात. परिणामी त्यांना नाईलाजास्तव आर्थिक भुर्दंड सहन करून खासगी दवाखान्यात उपचार घ्यावे लागत आहेत. त्यामुळे खासगी दवाखाने रुग्णांनी हाऊसफुल्ल झालेले दिसून येत आहेत. मागील काही दिवसापासून वातावरणात बदल झाल्यामुळे परिसरात ताप, खोकला, सर्दी, डोकेदुखी, हिवताप,आदी आजाराने थैमान घातले आहे. परंतु हा दवाखाना बंद असल्यामुळे रुग्णांची मोठ्या प्रमाणावर हेळसांड होत आहे. शिवाय दवाखाना बंद असल्यामुळे एकही वैद्यकीय अधिकारी किंवा कर्मचारी हजर नाहीत. त्यामुळे रुग्णांची हेळसांड थांबविण्यासाठी हा आयुर्वेद दवाखाना तत्काळ सुरू करून वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी ग्रामीण भागातील नागरिक करीत आहेत.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# खामगाव सामान्य रुग्णालयात चोरी करणाऱ्यावर गुन्हा दाखल...




**जनसंचलन/ खामगाव**
येथील सामान्य रुग्णालयातील सिसीटिव्ही कॅमेऱ्याचा माऊस लंपास करणारा चोरटा सिसीटिव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. येथील वैद्यकीय दालनातील सिसीटिव्ही कॅमेऱ्याचा माऊस पेपरवेट चोरी गेल्याची घटना उघडकीस आली. यानंतर येथील सिसीटिव्ही कॅमेऱ्याचे फुटेज तपासले असता अनिल खैवान वय ३० वर्ष रा. शंकर नगर हा चोरी करतांना दिसून आला. याबाबत वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत वानखडे वय ३५ वर्ष यांनी शहर पोस्टेला तक्रार दिली असून पोलिसांनी यावरुन अनिल खैवान याच्याविरुध्द कलम ३७९ भादंवीनुसार गुन्हा दाखल केला आहे. सामान्य रुग्णालयात मागील काही दिवसात अनेक चोरीच्या घटना घडलेल्या आहेत. त्यांचाही यानिमित्ताने उलगडा होण्याची शक्यता आहे.

# ऑनलाइन जुगाराच्या जाहिराती करु नका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे सेलिब्रिटींना आवाहन...

**वृत्तसंस्था/ नागपूर**
महादेव ॲप हा ऑनलाइन जुगाराचा प्रकार असून इतर अनेक वेबसाइट्सच्या माध्यमातून फसवणूक सुरू आहे. वेगवेगळ्या देशांतून हे फसवणुकीचे रॅकेट चालविले जात आहे. दहशतवादी संघटनांशीही त्यांचे धागेदोरे उसल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे चौकशीसाठी एसआयटी नेमली आहे. महाराष्ट्रात डायनामिक सायबर सेक्युरिटीचा प्लॅटफॉर्म तयार करण्यात येत आहे. अशा प्रकारांना प्रोत्साहन मिळू नये, यासाठी सेलिब्रिटींनीही ऑनलाइन जुगाराच्या जाहिराती करू नयेफ असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केले. महादेव ॲपच्या माध्यमातून देशभरात ऑनलाइन बेटिंग करण्यासाठी अनेक बेटिंग ॲपची निर्मिती करण्यात आलेली आहे. मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार होत आहे. दहशतवादी संघटनातही यात सहभागी आहेत. याची चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करण्यात यावी, असा मुद्दा आमदार ॲड. आशिष शेलार यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या माध्यमातून उपस्थित केला. महादेव ॲपच्या माध्यमातून ६७ वेबसाइट्स चालविल्या जात असून त्यांचे वेगवेगळे मालक आहेत. या ॲपची नोंदणी दक्षिण अमेरिकेतील व्हेनेझुएला येथे आहे. या गुन्ह्यांत सहभागी असलेल्या आरोपीला दुबई येथे अटक करण्यात आली आहे. मूळ गुन्ह्यांची चौकशी सक्तवसुली संचालनालयकडून (ईडी) सुरू आहे. दोन महिन्यांत ही कारवाई केली जाईल, असे फडणवीस म्हणाले. महाराष्ट्रातील जनतेची लूट होऊ नये, अशी अपेक्षा नाना पटोले यांनी व्यक्त केली. डीपफेकचे प्रकार वाढले असल्याचा मुद्दा वर्षा गायकवाड यांनी उपस्थित केला. युरोपियन युनियनने एआय कायदा आणला आहे, तसा कायदा आपण आणत आहे का, असा सवाल आमदार आदित्य ठाकरे



यांनी उपस्थित केला.जीएसटीफ्चोरी केली असेल तर त्याचीही चौकशी केली जाईल. डीपफेकच्या माध्यमातून अनेकांचे चेहरे बदलवून बदनामी केली जात आहे. घरी बसूनही बँक लुटण्याचे प्रकार होऊ शकतात. या पार्श्वभूमीवर इ्नसायबर सीक्युरिटीचा एलिट फोर्सफ तयार करण्यात येत आहे. एप्रिल-मेपर्यंत हा प्लॅटफॉर्म तयार होईल, असे नियोजन करण्यात येत आहे. आपला खासगी डेटा सुरक्षित राहावा यासाठी जगभर मंथन सुरू आहे. सुरक्षेत महाराष्ट्र कुठेच मागे राहणार नाही, अशी हमी देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# बापलेकाच्या खूनप्रकरणी दोघांना जन्मठेप...



**जनसंचलन/मेहकर**
तालुक्यातील सोनाटी येथे शेताच्या धुऱ्याच्या वादातून दोघा बापलेकाचा दुर्दैवी अंत झाला होता. याप्रकरणी मेहकर जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायधीश एस.एम. चंदगडे यांनी गुरूवारी दोघा जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. फिर्यादी जयश्री अशोक सोनटक्के राहणार सोनाटी यांनी मेहकर पोलिसात तक्रार दाखल केली होती की, ११ एप्रिल २०१९ रोजी सोनाटी येथील शेतात त्यांचे सासरे दिगंबर सोनटक्के आणि पती अशोक सोनटक्के हे ट्रॅक्टरने नांगरटी करत होते. दुपारी ४ ते ४.३० वाजेच्या दरम्यान बबन वैजिनाथ सोनटक्के, प्रकाश वैजिनाथ सोनटक्के, नंदाबाई बबन, चंद्रकला प्रकाश सोनटक्के, संदिप प्रकाश सोनटक्के यांनी कुऱ्हाड आणि लाठीने माझे सासरे व पतीस मारहाण केली. दिगंबर सोनटक्के व अशोक सोनटक्के यांना जखमी अवस्थेत मेहकर येथे रुग्णालयात भरती केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. याप्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकारी वकील ॲड. जे. एम. बोदडे यांनी अकरा साक्षीदार तपासले. जयश्री सोनटक्के या प्रत्यक्षदर्शी साक्षीदार होत्या. साक्षीपुरावे आणि ॲड बोदडे यांचा युक्तिवाद लक्षात घेता न्यायधीश एस. एम. चंदगडे यांनी आरोपी बबन वैजिनाथ सोनटक्के आणि प्रकाश वैजिनाथ सोनटक्के यांना जन्मठेपेची शिक्षा व प्रत्येकी १० हजार रुपये दंड ठोठावला. नंदाबाई सोनटक्के, चंद्रकला सोनटक्के, संदिप सोनटक्के यांची निर्दोष मुक्तता केली आहे. कोर्ट पैरवी पोलीस कर्मचारी पुरुषोत्तम गारोळे यांनी केली.

मिटकॉन कन्सल्टन्सी ॲंड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस लि.पुणे
MITCON™
Solutions for Sustainable Tomorrow
मिटकॉन नेचर बेस्ड सोल्युशन्स लिमिटेड
महोगनी विश्व ॲग्रो लिमिटेड
कृषि-वानिकी : शाश्वत विचार!
देईल पर्यावरण संरक्षणासोबत आर्थिक समृध्दी!
MAHOGANI VISHWA AGRO
MITCON NATURE BASED SOLUTIONS



कृषि-वानिकी : १.भारत हा कृषिप्रधान देश आहे, उत्तम प्रकारची जमीन व हवामान अनुकूल असल्याने कृषि-वानिकीच्या माध्यमातून उत्तम लाकूड निर्मिती हे संस्थेचे ध्येय आहे.
महोगनी लागवडीचे नियोजन: १.पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन असावी.
रोपांची लागवड पध्दती :- • एक एकर क्षेत्रासाठी ४४४ रोपे लागतील.
• लागवडीचे अंतर १०x१० फूट किंवा ८x१२ फूट असावे.
• सरासरी खड्ड्यांची लांबी, रुंदी व खोली १.५ x १.५ x १.५ फुटाची असावी.
भारतात लाकूड उद्योगातील संधी: १. निर्यातक्षम लाकूड निर्मिती करुन ग्रामीण भागात उद्योग व रोजगार निर्मीती करणे.
मिटकॉनद्वारे शेतकऱ्यांना मिळणार कार्बन क्रेडिट
महोगनी कृषि-वानिकी लागवडीतून विश्वातील पहिला कार्बन क्रेडिट प्रकल्प

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सोनाळ्याचा संत्रा जागतिक बाजारपेठेत पोहचवू संदीप शेळकेंचे सोनाळ्यात प्रतिपादन

जनसंचलन/संग्रामपुर

सोनाळा परिसर हा संत्रा बेल्ट आहे. मात्र दुर्दैवाची बाब म्हणजे याठिकाणी संत्रा प्रोसेसिंग युनिट नाही. लोकप्रतिनिधींना या भागात एखादा प्रकल्प उभारता आला नाही. संत सोनाजी महाराजांच्या नावाने संत्र्याचा ब्रँड विकसित करून इथला संत्रा जागतिक बाजारपेठेत पोहचवू, अशी ग्वाही राजर्षी शाहू परिवाराचे अध्यक्ष तथा वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी दिली. मंगळवारी (१२ डिसेंबर) रोजी संत सोनाजी महाराजांच्या सोनाळा या पवित्र भूमीत संवाद मेळाव्याच्या माध्यमातून त्यांनी जनतेशी हितगुज साधले. पंचक्रोशीतील नागरिकांचा सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पुढे बोलतांना संदीप शेळके म्हणाले, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांच्याकडे प्रबळ इच्छाशक्तीचा अभाव आहे. अन्यथा पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे आपल्याही विकास झाला असता. जनतेने या गोष्टीकडे चिकित्सक दृष्टीने पाहिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.



विकास हाच एकमेव ध्यास जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेऊन गेल्या आठ महिन्यांपासून गावोगावी वन बुलढाणा मिशनच्या संवाद मेळाव्याच्या माध्यमातून विचारांची पेरणी करतोय.आपली भूमिका ठाम आहे. येणाऱ्या काळात जिल्हा विकासात अव्वलस्थानी आणायचाय. सिंचन, रोजगार, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण यासह सर्वच क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवण्यासाठी प्रयत्न करायचे असल्याची भूमिका संदीप शेळके यांनी व्यक्त केली. जिल्हा अनेक दृष्टीने समृध्द आहे. परंतु. उपलब्ध साधनांचा उपयोग करून जिल्ह्यात मोठे प्रकल्प उभे करणे गरजेचे आहे.खरं तर इतक्या वर्षांतच हे व्हायला पाहिजे होते. परंतु लोकप्रनिधींनी याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही. वन बुलडाणा मिशनच्या माध्यमातून आपल्याला विकसित, समृद्ध, हेवा वाटावा असे जिल्ह्याचे आदर्श मॉडेल सर्वांसमोर ठेवायचे आहे, असा आशावाद संदीप शेळके यांनी व्यक्त केला.

## छत्रपती शिवाजी महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक परिसरातील दारूची दुकाने तात्काळ काढा वंचित बहुजन आघाडीची मागणी...

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा शहरातील संगम चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरातील व जयस्तंभ चौक येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरातील थाटलेली दारूचे दुकाने हे तात्काळ काढण्यात यावे या साठी दि १५ डिसेंबर रोजी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देउन मागणी करण्यात आली आहे. शहरातील संगम चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक व जयस्तंभ चौकात डॉ. बाबासाहेब आबेडकर यांचे स्मारक उभारले जात आहे. ही स्मारके सर्वांना प्रेरणा देणारी असून, नागरिक या महामानवांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी येतील. मात्र, दोन्ही स्मारकांच्या अगदी जवळच दारूची दुकाने आहेत. स्मारकच्या दाहीने ही अशोभनीय असलेली दुकाने तातडीने हटविण्यात यावी, अशी मागणी वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने सतीश पवार यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात नमूद केल्यानुमार, संगम चौकात महाराष्ट्राचे आराध्यदैवत रयतेचे राजे छजपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे काम अंतिम टप्प्यात आहे. गेल्या काही दिवसांतच स्मारकाचे उद्घाटन होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे स्वराज्याचे निर्माते असून संपूर्ण बहुजनांसाठी आदर्श आहेत.या परिसरामध्ये दारूची दुकाने ठाठलेली आहेत. हे तेजोमय स्मारक पाहण्यासाठी अभिवादन करण्याकरिता जिल्हाभरातून शिवप्रेमी या ठिकाणी येणार आहेत. दारूचे दुकान ही बाब गंभीर आहे तसेच जयस्तंभ चौकामध्ये महामानव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पुतळा होणार असून तेथे देखील जिल्हाभरातील नागरिक अभिवादन करण्यासाठी येणार आहेत. तेथेही काही अंतरावर लागूनच दारूची दुकाने ठाटलेली आहेत. महापुरुषांच्या विचारधारे नुसार दारू हा घातक घटक असून, त्यामुळे समाजाचे नुकसान झालेले आहे. एकीकडे महापुरुषांना अभिवादन करण्यासाठी जमा होणारी गर्दी व दुसरीकडे आजूबाजूला असलेल्या दारूच्या दुकाने ही बाब परस्परविरोधी आहे भविष्यात याहून तणाव वातवरण निर्माण होण्याची शक्यता आहे. दारूचे दुकाने बंद करून समाजासमोर आदर्श उभा करणे अपेक्षित होते, असेही सतीश पवार यांनी निवेदनात म्हटले आहे. निवेदन देताना बाला राऊत, अर्जुन खरात, अनिल पारवे, ॲड. के.ए कदम, किरण पवार, सचिन गवई आदी लोक उपस्थितीत होते.



# राज्यस्तरीय क्रॉस कंट्री निवड व अजिंक्यपद स्पर्धा...

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र असोसिएशन व बुलढाणा जिल्हा ॲमॅच्युअर ॲथलेटिक्स असोसिएशन बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय क्रॉस कंट्री निवड व अजिंक्यपद स्पर्धाचे उद्घाटन व बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.हा उद्घाटन बक्षीस वितरण समारंभ सोहळा दि १७ डिसेंबर रोजी सकाळी ७ ते १० वाजेपर्यंत सहाकर विद्या मंदिर समोर चिखली रोड येथे होणार आहे.या कार्यक्रमाचे उद्घाटन बुलढाणा विधानसभा आमदार संजय गायकवाड व अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघाचे आमदार धिरज लिंगाडे यांच्या हस्ते होणार आहे तर प्रमुख उपस्थिती मध्ये बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव व माजी मंत्री तथा आमदार राजेंद्र शिंगणे हे उपस्थितीत राहणार आहे. तर प्रमुख पाहुणे म्हणुन उपविभागीय अधिकारी बुलढाणा राजेंद्र जाधव, जिल्हा क्रिडा अधिकारी बाळकृष्ण महानकर, नगर परिषद मुख्यधिकारी गणेश पांडे, चिफ मॅनेजिंग डायरेक्टर बुलढाणा अर्बन डॉ सुकेश झंवर,राष्ट्रवादी महिला जिल्हाध्यक्ष अनुजाताई सावळे,जिल्हाअध्यक्ष शिवसेना ओमसिंग राजपूत,अदिती अर्बन अध्यक्ष सुरेश देवकर, मृत्युंजय गायकवाड, विजय जायभाये,ॲड शरद राखोडे, श्री सतीश उचील हे उपस्थितीत राहणार आहे.

# शाळेतील शिक्षकांना आर एस पी प्रशिक्षण...


## रहदारी नियम व अपघाता नंतरची तत्परता शिकवणार विद्यार्थ्यांना...

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील शाळेच्या विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम व अपघात झाल्यानंतर काय तत्परता बाळगायची हे सर्व शिक्षण आता देण्यात येणार आहे... अपघाताचे प्रमाण वाढले आहे त्याला आला आळा घालण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांना सर्व वाहतूक नियम माहित असणे आवश्यक आहे त्यासाठी जिल्ह्यातील आर टी ओ, वाहतूक अधिकारी व पोलीस प्रशासन यांनी १३ ही तालुक्यातील ४० शिक्षकांना १० दिवसाचे आर एस पी प्रशिक्षण देण्यात आलंय. ..या प्रशिक्षणात शिक्षकांना सर्व वाहतूक नियम ट्राफिक हॅन्डलिंग व अपघात झाल्यानंतची तात्परता शिकवण्यात आलंय... त्या १० दिवसीय प्रशिक्षण नंतर पोलीस मुख्यालंय मैदानावर समारोपीय कार्यक्रम संपन्न झाला यावेळी प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांनी प्रात्यक्षिक करून दाखविली तर शेवटी त्यांना आर एस पी प्रमाणपत्र देण्यात येऊन सन्मान करण्यात आला..

# धावत्या बस मध्ये चालकाचा प्रवाशांच्या जीवाशी खेळ...

जनसंचलन/बुलडाणा



धावत्या बस मध्ये चालकाचा प्रवाशांच्या जीवाशी खेळ. रात्रीच्या वेळी बस चालवत असताना मोबाईलवर खेळत होता चालक. काल सायंकाळी बुलढाणा आगाराच्या अजिंठा येथे जाणाऱ्या बसचा चालक हा धावत्या बसमध्ये मोबाईलवर खेळत असल्याचं व्हिडिओ समोर आला आहे. या बस मध्ये जवळपास ४५ प्रवासी होते. बुलढाणा आगाराच्या बस चालकाचा हा प्रवाशांच्या जीवाशी खेळणारा प्रकार संतापजनक असल्याने काही प्रवाशांनी आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात हा व्हिडिओ कैद केला. एसटी चालकाला कर्तव्यावर असताना बसमध्ये मोबाईलवर बोलण्यास सुद्धा बंदी असताना हा चालक मात्र रात्रीच्या वेळी बस चालवत असताना मोबाईलवर खेळत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे . हा व्हिडिओ सध्या मोठ्या प्रमाणात वायरल होत आहे.

# धारावीच्या गरिबांना घरं मिळू द्यायची नाहीत नवीन कंत्राटदारांच्या सगळ्या अटी शर्ती उद्धव ठाकरे यांनीचं ठरवल्या देवेंद्र फडणवीस यांचा हल्लाबोल...

वृत्तसंस्था/ पुणे

अदानी समूह करत असलेल्या धारावी पुनर्विकास प्रकल्पाविरोधात उद्या उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली भव्य मोर्चा काढण्याची तयारी मुंबईत सुरू आहे. धारावीचा पुनर्विकास करताना ३०० चौरस फुटांची घरे देण्यात येणार आहेत. त्याऐवजी ४०० ते ५०० चौरस फुटांची घरे द्यावीत, या प्रमुख मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) हा मोर्चा काढत आहे. शिवसेनेच्या या मोर्चावरून आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला आहे. उबाठा सेनेला धारावीच्या गरिबांना घरं मिळू द्यायची नाहीत. हा प्रकल्प त्यांना डिरेल करायचा आहे. यामध्ये नवीन कंत्राटदारांच्या सगळ्या अटी शर्ती उद्धव ठाकरे यांनीचं मुख्यमंत्री असताना ठरवलेल्या आहेत. आता उद्धव ठाकरे दुटप्पी भूमिका घेत आहेत. केवळ टीडीआर लॉबीच्या फायद्यासाठी सुपारी घेऊन हा मोर्चा काढण्यात येत आहे. या मोर्चाचा काही परिणाम होणार नाही. आम्ही धारावीकरांना पक्की घर देणार म्हणजे देणारचं. असं देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी ही धारावीची ओळख आहे. जवळपास ६०० एकरवर धारावी वसली आहे. धारावीत ६० हजारांहून अधिक झोपड्या असून त्यात १० लाखांहून अधिक लोक राहतात. शिवाय धारावीत १३ हजारांहून अधिक लघु उद्योग आहेत. लघु उद्योगांतून धारावीमध्ये मोठी आर्थिक उलाढाल होते. त्यामुळे धारावीसाठी निघणाऱ्या या मोर्चावरून आता राज्यातलं राजकारण तापलं आहे. महाराष्ट्र सरकारने उद्धव ठाकरे यांच्या या मोर्चाला आतापर्यंत परवानगी दिलेली नाही. त्यावरूनच आता शिवसेना (उद्धव



बाळासाहेब ठाकरे) आणि सरकार यांच्यात आरोप प्रत्यारोपाच्या फेऱ्या रंगत आहेत.

# सभागृहाच्या कामकाजात अडथळा काँग्रेसच्या ९ खासदारांसह १५ खासदारांवर निलंबनाची कारवाई...



वृत्तसंस्था/ नवी दिल्ली

सभागृहाच्या कामकाजात अडथळा आणल्याबद्दल लोकसभेने गुरुवारी काँग्रेसच्या ९ खासदारांना हिवाळी अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीसाठी निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे. गोंधळ घालणे आणि खुर्चीचा अपमान केल्याप्रकरणी आतापर्यंत १५ विरोधी खासदारांना निलंबित करण्यात आले आहे. संसदेतून निलंबित करण्यात आलेल्या १५ खासदारांपैकी ९ काँग्रेसचे, २ सीपीएम, २ डीएमके आणि एक सीपीआय पक्षाचा आहे. निलंबित करण्यात आलेल्या काँग्रेस खासदारांमध्ये टीएन प्रतापन, हिबी एडन, एस जोतिमणी, रम्या हरिदास आणि डीन कुरियाकोसे यांचा समावेश आहे. निलंबित करण्यात आलेल्या विरोधी लोकसभा खासदारांमध्ये काँग्रेसचे चार, सीपीआय, डीएमकेचे प्रत्येकी दोन आणि सीपीआय(एम)च्या एका खासदाराचा समावेश आहे. काँग्रेसच्या चार खासदारांमध्ये बेनी बेहानन, व्हीके श्रीकंदन, मोहम्मद जावेद आणि मणिकम टागोर यांचा समावेश आहे. बेहानन आणि श्रीकंदन हे केरळमधील चालकुडी आणि पलक्कड लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत, तर मोहम्मद जावेद हे बिहारच्या किशनगंजचे प्रतिनिधित्व करत आहेत आणि मणिकम टागोर हे तामिळनाडूच्या विरुधुनगरचे खासदार आहेत.या खासदारांच्या निलंबनाचा प्रस्ताव संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आणला होता. तो सभापतींच्या खुर्चीवर बसलेल्या भर्तृहरी महताब यांनी मंजूर केला आहे. हिवाळी अधिवेशनाच्या उर्वरित दिवसांसाठी या खासदारांना निलंबित करण्यात आले आहे. यावेळी विरोधी पक्षाचे खासदार सतत सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करताना दिसले होते. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय तृणमूल काँग्रेसचे राज्यसभा खासदार डेरेक ओब्रायन यांना अधिवेशनाच्या उर्वरित दिवसांसाठी निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणी टीएमसीने सांगितले की, जबाबदारी टाळणे ही भाजपची सर्वात मजबूत बाजू आहे. दरम्यान लोकसभेत बुधवारी झालेल्या सुरक्षा भंगावरून संसदेत विरोधकांच्या निदर्शनाशी सर्व निलंबनांचा संबंध आहे. या निषेधामुळे गुरुवारी दोन्ही सभागृहांचे कामकाज वारंवार तहकूब करावे लागले होते.

# महाआघाडी डबल इंजिन नसून एक फुल आणि दोन डाऊटफुल ते चुकीच्या झाडाला लटकलेत संजय राऊतांची टीका...

वृत्तसंस्था/ नागपूर



राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली काढलेल्या युवा संघर्ष यात्रेचा आज नागपुरात समारोप झाला. या समारोप सभेत संजय राऊत बोलत होते. त्यावेळी राऊत यांनी आपल्याच शैलीत सत्ताधाऱ्यांवर टीका केली. संजय राऊत यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली. मोठ्या पवारांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी आणि धाकट्या पवारांना आशीर्वाद देण्यासाठी आज आपण आलो आहोत, पण मधला पवार कुठेतरी लटकला आहे, असे राऊत म्हणाले. ते चुकीच्या झाडाला लटकले आहे, त्यांना लटकतच राहू द्या, लटकत लटकट खाली पडतील, आणि मग त्यांना कळेल आपण चुकीच्या झाडावर लटकलो, अशी टीका संजय राऊत यांनी केली. पुढे बोलताना राऊत म्हणाले की, ही मर्दांची सभा आहे. ही लढणाऱ्यांची सभा आहे. संघर्ष करणाऱ्यांची ही सभा आहे. ही पळपुट्यांची सभा नाही आहे. आम्ही उठू संघर्ष करू आणि या महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आणू. मध्य प्रदेशची हवा महाराष्ट्राला लागू देणार नाही, असेही राऊत म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशभर गॅरंटी देत आहेत. पण आजची ही सभा नरेंद्र मोदीं यांना ही गॅरंटी देते की, २०२४ ला तुम्ही सत्तेवर येणार नाही. ही आमची गॅरंटी आहे. फडणवीस २०२४ मध्ये तुम्ही सत्तेत नसल्याची गॅरंटी आहे. अनिल देशमुख हे तुरुंगातील मित्र आहे. जेलमधली मैत्री पक्की असते. आम्ही झुकलो नाही. आम्ही वाकलो नाही आम्ही तुटलो नाही.मी बाळासाहेब ठाकरेंचा शिवसैनिक आहे. पवार साहेबांचाही मी माणूस आहे. याला म्हणतात डबल इंजिन. रोहित पवार यांनी ८०० किलोमीटरचा प्रवास केला आहे. गेल्या १० वर्षांपासून हा देश थांबला आहे, म्हणून आपल्याला चालावं लागतं, असेही संजय राऊत म्हणाले. आजची सभा प्रचंड मोठी आहे. हा महाराष्ट्र झुकणार नाही. आमचा पक्ष तोडून आम्ही तुम्हाला २०२४ च्या निवडणुकीत फोडू. शरद पवार यांचे वय किती? बाळासाहेबांचे वय तसे नव्हते. त्यामुळे आमच्या पाठीवर हात ठेवा आणि फक्त लढ म्हणा, असे आवाहन संजय राऊत यांनी करत महाआघाडी ही डबल इंजिन नाही आहे. हे एक फुल आणि दोन डाऊटफुल आहे, अशी टीका संजय राऊत यांनी सत्ताधारी महाआघाडीवर केली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

| 8x8 cm (Width 8 cm, Hight 8 cm) | 5x8 cm (Width 8 cm, Hight 5 cm) | 5x8 cm (Width 23 cm, Hight 5 cm) |
|---|---|---|
| 1 Month=5000/- | 1 Month=3500/- | 1 Month=3500/- |
| 15 Day=3500/- | 15 Day=2200/- | 15 Day=2200/- |
| 7 Day=2000/- | 7 Day=1500/- | 7 Day=1500/- |

**एक दिवसाची जाहिरातः वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

**One Day**

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| 2600/- (Width 12 cm, Hight 12 cm) | 1800/- (Width 10 cm, Hight 8 cm) | 1300/- (Width 8 cm, Hight 8 cm) |
|---|---|---|

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्कः

अजय राजगुरे-9922359674

ऑफिस नं.-9129582958

पत्ता- शिव शॉपिंग कॉम्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा

Mail Id: jansanchlan@gmail.com